# प्रेसनोट

दि.०१/०५/२०१९

दि.३०/०४/२०१९ रोजी सेवानिवृत्त होणा-या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा निरोप समारंभ मा.डॉ.के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे अध्यक्षतेखाली कॉन्फरन्स हॉल,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर येथे दि.३०/०४/२०१९ रोजी संध्याकाळी ०५.०० ते ०७.०० या वेळेत पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय यांनी केले. कार्यक्रमास श्री.शिवाजी बोडखे, पोलीस सह आयुक्त, श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. साहेबराव पाटील, अपर पोलीस आयुक्त (प्रशासन),श्री.संभाजी कदम,पोलीस उप आयुक्त,(आर्थिक व सायबर) व श्री. मितेश घट्टे, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा तसेच पोलीस दलातून सेवानिवृत्त होणारे २० अधिकारी/कर्मचारी व त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थीत होते. सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमामध्ये मा.डॉ.के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सन्मानित केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. श्री. मितेश घट्टे, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला.

(कल्याणराव विधाते)
सहायक पोलीस आयुक्त,
मानव संसाधन विभाग,पुणे शहर.


पुणे शहर

